शुक्रवार दि.१९ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# लोकसभेत पाठवा बीड जिल्ह्याची शान आणि मान उंचावण्याचे काम करीन

## दारात आलेल्या माणसाची जात कधीच विचारली नाही-पंकजा मुंडे




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ग्रामविकासमंत्री असताना बीड जिल्ह्यामध्ये विकास निधी देताना कधीही दुजाभाव केला नाही. डोंगरखोऱ्या बरोबर वाडी वस्त्याचाही विकास केला. त्याचबरोबर ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून अनेक लोकहिताचे निर्णय घेऊन थेट शेवटच्या माणसापर्यंत त्याचा लाभ मिळवून दिला आहे कोविड काळा मध्येही अनेक वेळा स्वत:चा जीव धोक्यात घालून काम करून सर्वसामान्य माणसाला जगवण्याचे काम केले. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये मला खासदार म्हणून निवडून दिल्यानंतर बीड जिल्ह्याची शान आणि मान उंचावली जावी असेच काम करीन.. तसेच माझ्या दारात आलेल्या माणसांची जात कधीच विचारली नाही आणि यापुढेही असेच काम करत राहील अशी ग्वाही बीड लोकसभेच्या भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रीय समाज पार्टी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी दिली.

आष्टी तालुक्यातील उंदरखेल येथे धानोरा दौलावडगाव व धामणगाव गटातील कार्यकर्ता मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी आमदार सुरेश धस, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र चे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे युवा नेते यदत्त समाजसेवक विजय गोल्हार ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती राजेंद्र दहातोंडे ,दूध संघाचे माजी चेअरमन संजय गाढवे ,भा ज.पा.आष्टीतालुकाध्यक्ष अँड साहेबराव म्हस्के, भारतीय जनता पार्टीचे अनुसूचितच जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अँड.वाल्मिक निकाळजे,अमोल तरटे,माजी सभापती अशोक इथापे,माजी सभापती अंकुश चव्हाण,माजी उपसभापती राजेंद्र दहातोंडे, पंचायत समिती सदस्य यशवंत खंडागळे,डॉ. शैलेजा गर्जे, एन.टी.गर्जे,रावसाहेब शिरसाट,सरपंच राणी सागर दहातोंडे,गहुखेल सरपंच सौ.प्रतिभा मल्हारी शिंदे दत्तात्रय पोपळे,शरद देसाई, मुरलीधर फसले,आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की,प्रीतम ताईंनी गेल्या दहा वर्षांमध्ये बीड जिल्ह्यामध्ये अनेक विकासाची कामे केली आहेत त्यांच्या विजयाची पंतप्रधान नरेंद्र मोदी सोबत हॅट्रिक व्हावी ही इच्छा होती मात्र भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीने मला उमेदवारी दिली.मी उमेदवारी मागितली नाही.आता तुम्ही प्रीतम या माझ्या लहान बहिणीला जेवढे मताधिक्य दिले त्यापेक्षाही जास्तीचे मताधिक्य मोठ्या बहिणीला देऊन मोठ्या फरकाने विजयी करण्याचे आवाहन केले.मी महाराष्ट्र राज्य शासनात ग्रामविकास मंत्री असताना स्वातंत्र्यानंतर काळात कधीही न झालेल्या ग्रामीण भागामध्ये रस्ते पाणी पुरवठा योजना ग्रामविकास भवन शाळा खोल्या बांधकामे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम यासारखे लोकउपयोगी विकास कामे मोठ्या प्रमाणात केली आहेत.ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर आणि सर्वसामान्य माणसाचा विकास डोळ्यासमोर ठेवून मी काम करत राहिले.त्यामध्ये पिक विमा, अनुदान,शिक्षकांच्या बदल्या,रस्ते,पाणी आदी प्रश्न सोडवण्यावर भर दिला. सध्या राज्यामध्ये गाजत असलेला आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना त्या म्हणाल्या की आरक्षण हे विधानसभेच्या म्हणजेच राज्याच्या खात्यातील प्रश्न आहे. आमरण उपोषण करण्याने आरक्षण मिळत नसते ते कायदेशीर बाब समजावून घेऊनच आरक्षण मिळत असते.

सध्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळत नाही त्यामुळे संसदेतील पहिले भाषण माझे शेतमालाला भाव देण्यावर असणार आहे.विरोधकांवर टीका करताना त्या म्हणाल्या की बजरंग सोनवणे ज्या खात्याचे जिल्हा परिषद मध्ये सभापती होते त्या खात्याची मी मंत्री होते त्यामुळे अधिकाधिक निधी बीड जिल्ह्याला देण्याचे काम मी केले आहे.बीड जिल्ह्यामध्ये माझे पुढील व्हिजन मोठे हॉस्पिटल तयार करण्यावर असून दारात आलेल्या माणसाची मी कधीही जात विचारणार नसल्याची ग्वाही पंकजा मुंडे यांनी दिली. यावेळी बोलताना सुरेश धस म्हणाले की मी १९९८ पासून स्वर्गीय मुंडे साहेबांचे नेतृत्वाखाली काम केले आहे.गेल्यावेळी आष्टी मतदार संघातून ७१ हजार मतांची लीड प्रीतम मुंडे यांना दिली होती या निवडणुकीतही भरघोस मते देणार आहोत.या डोंगरी भागामधील बांदखेल,वेलतुरी, चिंचेवाडी,जोमदार तांडा इत्यादी रस्त्याचे काम पंकजाताईंनी ग्रामविकास मंत्री असताना केले असून मोठ्या प्रमाणावर विकास निधी दिलेला आहे.त्याचबरोबर पंकजाताईंकडे महिला व बालविकास मंत्री हे खाते असताना जिल्ह्यामध्ये मुलींचा जन्मदर वाढवण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे.सध्या आष्टी तालुक्यामध्ये जलयुक्त ची कामे मोठ्या प्रमाणावर चालू असून प्रत्येकाला पिण्याच्या पाण्याची सोय आता होणार आहे. अहिल्या नगर- दौलावडगाव बीड या रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन या रस्त्याची वळणे काढण्याची मागणी ही आमदार धस यांनी पंकजाताई यांच्याकडे केली.मच्छिंद्रनाथ गडावर येणारा लोणी ते मायंबा या सहाशे कोटी रुपये रस्त्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याने या ठिकाणी येणाऱ्या भक्तांची सोय होणार आहे महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना विजयी करण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

### संसदेतील माझे पहिले भाषण शेतकऱ्यांसाठी असेल

मि पालकमंत्री असतांना जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न केले.जिल्ह्याला विविध योजनेतून निधी उपलब्ध केला.जिल्ह्यात रस्त्याचे जाळे निर्माण केले.विकास कामे करत असतांना कोणताच दुजाभाव केला केला नाही.लोकसभेत गेल्यानंतर जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करील.सद्या शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आहेत.संसदेतले माझे पहिले भाषण हे शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी असेल असा विश्वास पंकजाताई मुंडेंनी उपस्थित शेतकऱ्यांना दिला

**पंकजाताई मुंडे राज्यात महिला व बालकल्याण मंत्री असतांना त्यांनी विशेष काम केले. त्यांनी जिल्ह्यात होणार्या स्त्रीभ्रूण हत्या थांबण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आज १ हजार मुलांमागे ९८५ पर्यंत मुलींचा जन्म दर गेला आहे.पंकजाताईंनी त्याच्या काळात केलेल्या कामाचे फळ असल्याचे आ.सुरेश धस यांनी सांगीतले.**

**पंकजाताई या महायुतीच्या उमेदवार आहेत.त्यामुळे सर्वांनी एकजुटीने त्यांच्यामागे उभे राहणे गरजेचे सर्व गट तट विसरून महायुतीचे धर्म सर्व कार्यकर्त्यांनी सांभाळावा पंकजाताईंना आष्टी विधानसभा मतदार संघातून भरघोस मत देऊन त्यांना विजयी करावे असे आवाहन भाजपा तालुका अध्यक्ष साहेबराव म्हस्के यांनी उपस्थित मतदारांना केले .**

# समृद्धी महामार्गावर निवडणूक पथकाने पकडली २ लाखांची रोकड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



लोकसभा निवडणूक काळात आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसह कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, जिल्ह्यात प्रवेश करणार्या वाहनांची तपासणी करून त्यात काही गैरकायदेशीर बाबी आढळल्यास किंवा रक्कम आढळून आल्यास योग्य कारवाई करण्यासाठी स्थीर सर्वेक्षण पथकाची स्थापना करण्यात आली आहे. याच पथकाने समृद्धी महामार्गावरील दुसरबीड येथील टोल नाक्यावर तब्बल दोन लाखाची रोकड पकडून, संबंधितांची कसून चौकशी सुरू केली आहे.

निवडणूक काळात कुठलाही गैर कारभार होऊ नये, मतदारावर चुकीच्या पद्धतीने प्रभाव पाडण्याचा प्रयत्न होऊ नये, गैरकृत्यांना आळा बसावा तथा निवडणुका या निकोप, भयमुक्त, पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात, यासाठी स्थीर सर्वेक्षण पथक कार्यरत करण्यात आलेले आहे. काल, दि. १७ एप्रिल रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास दुसरबीड येथील समृद्धी महामार्ग छत्रपती संभाजीनगर एक्झिट पॉइंट येथे स्थीर सर्वेक्षण पथकाकडून एकूण दोन लाख रुपयांची रोकड पकडण्यात आली. मुंबईवरून येणारी इनोव्हा या गाडीमध्ये ही रोख रक्कम पथकप्रमुख योगेश कांबळे, सहायक राजेंद्र गहिरराव, पोलीस शिपाई श्री. मांटे, फोटोग्राफर श्री. सरडे यांच्या नेतृत्वाखाली पकडण्यात येऊन पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली एसएसटी पथकाचे नोडल अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेणीकर हे पुढील कारवाई करत असून, ही रोख रक्कम कुठून आली व कुठे नेली जात होती. तिची वैधता वैगरे बाबींची माहिती घेतली जात होती.

### लोकप्रतिनिधी अथवा अधिकारी यांच्या जवळचं कोणीतरी मेल्यावरच

# बार्शी रोड वरील धोकादायक खड्डा बुजवणार का? जरा लाजा वाटु द्या-डॉ.गणेश ढवळे




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड शहरातील बार्शी रोडवरील स्वराज्य नगर कमानी समोरील खड्ड्यात आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर अपघाताची मालिका सुरूच असुन कित्येकांना आपला जीव गमावला लागला आहे तर कित्येकांना कायमचे अपंगत्व आलेले आहे. गेल्यावर्षी याच खड्ड्यात बीड शहरातील महेश राजेंद्र पाचंग्रे या घरातील कर्ता पुरुषाचा अपघातात बळी गेला होता.त्यानंतर सुद्धा लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकाऱ्यांना जाग आली नाही त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी तात्पुरता स्वरूपात खड्डा बुजवून टाकला होता. मात्र प्रशासनाला याची लाज वाटली नाही.

बीड मधील जनताच मुर्दाड झाली आहे त्यामुळे नुकत्याच बीड शहरातील पडलेल्या पावसामुळे पुन्हा खड्डा जशाच्या तसा झाला असुन ४ दिवसांपूर्वी एक मोटारसायकल स्वार जखमी झाला होता. लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी सामान्य माणसांचे किती बळी जायची वाट बघणार आहे की लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी यांच्या जवळचं कोणीतरी मेल्यावरच खड्डा दुरुस्ती करणार आहे का??? असा प्रश्न आम्हाला पडला आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी लाज सोडल्यामुळे अखेर परवा दि.२० एप्रिल शनिवार रोजी स्वर्गीय महेश राजेंद्र पाचंग्रे यांच्या जयंती दिनी पापनेश्वर मित्रमंडळ स्वखर्चाने पुन्हा खड्डा बुजवणार आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

### चारोळी

**भावनेचे बंध**
**हळुवार असावेत**
**शब्द मुके झाले तरी**
**स्पर्शातुन ते दिसावेत.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# ईव्हीएम व व्हीव्हीपॅट सीलबंद करण्याचे काम आजपासून सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १५-हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ८२-उमरखेड विधानसभा मतदारसंघ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय डॉ. सखाराम मुळे व तहसीलदार आर. यु. सुरडकर, सिद्धेश्वर वरणगावकर यांच्या देखरेखीमध्ये कडक सुरक्षा व्यवस्थेत व व्हीव्हीपॅट सीलबंद करण्याचे काम सुरू आहे. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट सीलबंद करण्याचे काम आजपासून सुरू झाले आहे. या कामाकडे उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सखाराम मुळे यांनी लक्ष घातले असून, संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थित पूर्ण होण्याबाबत दक्षता घेत आहेत.



# निवडणुकीचे पोस्टर्स, पॉम्पलेट प्रकाशित करताना मुद्रकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । भगवान जाधव**

१५-हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दि. १६ मार्च, २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ आणि आदर्श आचार संहितेच्या अनुषंगाने प्रिंट माध्यमामध्ये प्रकाशकाद्वारे प्रकाशित केलेली सामग्री आदर्श आचारसंहिता किंवा वैधानिक योजनेच्या चौकटीनुसार अयोग्य असल्याचे आढळून आल्यास त्याची जबाबदारी निश्चितीसाठी प्रकाशकाची माहिती प्रकाशित सामग्रीच्या मुख्य पृष्ठावर उघड करणे आवश्यक आहे.

निवडणुकीचे पोस्टर्स, पॉम्पलेट्सच्या मुख्य पृष्ठावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव, पत्ता मुद्रीत करणे आवश्यक आहे. प्रकाशक व मुद्रकाचे नाव व पत्ता न टाकता मुद्रण किंवा प्रकाशन करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे.

आयोगाच्या वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी सर्व महानगर पालिका, नगर पालिका अधिकाऱ्यांच्या किंवा होर्डींग, पोस्टर्स, बॅनर्स इत्यादीसाठी जबाबदार असलेल्या अशा प्राधिकरणांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत.

हिंगोली जिल्ह्यातील हिंद प्रिंटींग प्रेस, विकास प्रिंटर्स, सुरभी ऑफसेट, माऊली ऑफसेट, गुरु ग्राफिक्स यांच्यासह लोकसभा मतदारसंघातील इतर सर्व मुद्रकांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणुकीच्या पोस्टर्स, पॉम्पलेटसच्या मुख्य पृष्ठावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव, पत्ता मुद्रीत करूनच प्रकाशित करावेत. तसेच मुद्रीत केलेल्या पोस्टर्स, पॉम्पलेटच्या प्रत्येकी दोन प्रती जिल्हास्तरीय माध्यम व सनियंत्रण समितीला सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, हिंगोली दिले आहेत.

संपादकीय

# मच्छिमारांचा आक्रोश

लोकनेता न्यूज नेटवर्क

भारतीय मच्छिमार श्रीलंकेच्या ताब्यातील कच्चातिवू द्विपाच्या आसपास येतात, तेव्हा श्रीलंकेच्या नौदलाकडून त्यांना सातत्यानं धमकावलं जातं. अनेकदा गोळीबारही होतो. गेल्या दशकात श्रीलंकेच्या नौदलाकडून गोळीबाराच्या १४० घटना घडल्या. यात ९०हून अधिक भारतीय मच्छिमार मारले गेले. तमिळनाडूसाठी हा प्रादेशिक आणि भारतासाठी हा आंतरराष्ट्रीय समस्या ठरू लागली आहे.पोंगल नुकताच संपला होता आणि सणाची धामधूम उरकल्यावर तमिळनाडूच्या किनाऱ्यावरून ४०० बोटी मासेमारीसाठी समुद्रात गेल्या होत्या. त्यावेळी वर्षाच्या सुरुवातीलाच १८ तमिळ मच्छिमारांना श्रीलंकेने त्यांच्या सागरी हद्दीत मासेमारी करण्याच्या तथाकथित आरोपाखाली पकडलं. त्यांच्या बोटीही ताब्यात घेतल्या गेल्या. कच्चातिवू प्रकरणाची ठिणगी पडली ती याच वेळी. मच्छिमार नेते जेसू राजा तेव्हा म्हणाले होते, ‘समुद्रावरून सुरक्षित परत येणं हे आमच्यासाठी पुनर्जन्म मिळण्यासारखं झालंय, आमची कुटुंबं प्रचंड तणावात असतात. पाकच्या सामुद्रधुनीत मासेमारी करणं आता सुरक्षित राहिलेलं नाही.’ त्यांचे अनुभवाचे बोल खरे ठरले आणि नंतर श्रीलंकेकडून कारवाईचा जोर वाढला; त्यानंतर मच्छिमारांचा आक्रोशही वाढलाय. श्रीलंकेच्या नौदलाकडून भारतीय मच्छिमार वारंवार पकडले जातात. ही समस्या सुरू झाली १९७४मध्ये उभय देशांमध्ये झालेल्या करारानंतर. भारतीय मच्छिमारांना आंतरराष्ट्रीय सागरी हद्द ओलांडून व्हिसाशिवाय कच्चातिवूपर्यंत जाता येईल, असा तो करार होता. परंतु, त्यानंतरच्या १९७६च्या कराराने भारतीय मच्छिमारांना श्रीलंकेच्या पाण्यात मासेमारी करण्यास पूर्णपणे बंदी घातली गेली, हजारो मच्छिमारांवर याचा विपरित परिणाम झाला, तरीही १९८३मध्ये श्रीलंकेत वांशिक संघर्ष सुरू होईपर्यंत दोन्ही देशांकडून या पाण्यात सामंजस्याने मासेमारी केली जात होती. एलटीटीईने त्यांच्या हालचालींसाठी मच्छिमारी बोटींचा वापर करायला सुरुवात केली आणि सगळंच बिनसलं. त्यानंतर भारतीय मच्छिमार कच्चातिवूच्या आसपास येतात, तेव्हा श्रीलंकेच्या नौदलाकडून त्यांना सातत्यानं धमकावलं जातं. अनेकदा गोळीबारही होतो. गेल्या दशकात श्रीलंकेच्या नौदलाकडून गोळीबाराच्या १४० घटना घडल्या. यात ९०हून अधिक भारतीय मच्छिमार मारले गेले, १८० जखमी झाले आणि २९ बोटी बुडाल्या. आता तर श्रीलंकेच्या मच्छिमारांनीही भारतीय मच्छिमारांवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे.तमिळ मच्छिमार विश्रांतीसाठी आणि मासेमारीची जाळी सुकविण्यासाठी कच्चातिवू बेटावर थांबतात. या बेटावर दरवर्षी सेंट अँटोनीचा चर्च उत्सव होतो. याला दोन्हींकडचे मच्छिमार हजेरी लावतात. यंदा प्रथमच श्रीलंकेच्या कृतीविरोधात तमिळनाडूच्या मच्छिमारांनी या उत्सवावर बहिष्कार टाकला. बहुतांश मच्छिमार, अशिक्षित असतात, आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषा ओळखू शकत नाहीत. त्यामुळे भरकटून सीमा ओलांडली जाते. अनेकदा उंच लाटा आणि वाऱ्याच्या दिशेमुळे भारतीय नौका श्रीलंकेच्या पाण्यात अपघाताने जातात, काही घटनांमध्ये बोटीचं इंजिन बिघडणं आणि हवामानात अचानक बदल होणं ही कारणंही आहेत; पण सगळ्यांत महत्त्वाचं कारण भारतीय हद्दीतल्या समुद्रात माशांचं प्रमाण अत्यंत कमी झालंय, हे आहे. त्यामुळे मच्छिमारांना जीवावर उदार होऊन श्रीलंकेच्या हद्दीत जावं लागतं.राज्यसभेत सरकारने दिलेल्या एका उत्तरात २०१० ते २०२० दरम्यान तब्ब्ल ३४५० मच्छिमार पकडले, त्यातले बहुतांश सुटले. यातील बहुतेक अटका तमिळनाडू आणि उत्तर श्रीलंका यांच्यातील सामुद्रधुनीमध्ये होतात. सर्वांत ताजी अटक १६ मार्चला पाल्कच्या सामुद्रधुनीमध्ये नेदुंथीवू आणि कच्चातिवूदरम्यान घडली. २०१८ ते २०२३ या काळात १५० बोटी श्रीलंकेने ताब्यात घेतल्या. गेल्या वर्षी श्रीलंकेने २४३ तमिळ मच्छिमारांना पकडलं, ३७ बोटीही ताब्यात घेतल्या. या वर्षात सुमारे शंभर मच्छिमार पकडले गेलेत आणि १२ बोटी ताब्यात घेतल्यात. एक बोट बांधायला तब्बल ४० लाख रुपये खर्च येतो. बोट पकडली जाते तेव्हा क्षणार्धात बोटमालक रस्त्यावर येतो. आता तर बोटी परत करण्याऐवजी त्या सरकारी मालकीच्या होतील, असा कायदा श्रीलंका सरकारनं नुकताच मंजूर केलाय.मासेमारीसाठी उपलब्ध असलेला पारंपरिक भाग आक्रसतो आहे. मासेमारीवर अवलंबून घर चालवणं दिवसेंदवस कठीण होतंय, पण या मुद्द्यावर संसदेत चर्चाच होऊ दिली जात नाही, असा आरोप द्रमुक नेते करतात. स्टॅलिन सरकारने याबाबत ३५ वेळा परराष्ट्र विभागाला लिहिलं आहे, पंतप्रधानांना १३ वेळा स्मरण करून दिलंय. तमिळनाडूचा १९८३चा मासेमारी नियंत्रण कायदाही मच्छिमारांच्या मूळावर येतो आहे. मच्छिमार किनाऱ्यापासून तीन सागरी मैलांच्या पुढेच ट्रॉलर वापरून मासेमारी करू शकतील, असा तो कायदा असल्याने बोटी दूरवर हाकाराव्या लागतात आणि संकटात येतात. मच्छिमारांचे वाद सोडवण्यासाठी दोन्ही देशांचा एक संयुक्त कृतिगट २०१६ मध्ये तयार करण्यात आलाय, पण त्याच्या आजवर फक्त पाच बैठका झाल्या आहेत. तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी हा कृतिगट पुन्ही सक्रिय करण्याचं आवाहन केलंय.तमिळनाडूतील बहुतांश मच्छिमार ट्रॉलरद्वारे पर्ससीन नेटचा वापर करून मासेमारी करतात. ही पद्धत समुद्राचा तळ खरवडून काढते. कोरल आणि समुद्री शैवाल यांचंही नुकसान होतं. पाक सामुद्रधनीमधील मासे कमी होण्यामागे ही समुद्राला ओरबाडणारी पद्धत कारणीभूत आहे. यावर खलबते अनेक झाली, पण प्रत्यक्ष उपाययोजना झालेली नाही. भारतीय किनाऱ्यांलगतच्या मत्स्य दुष्काळ हा गंभीर मुद्दा आहे. मच्छिमार समुदाय गेली अनेक वर्षे याबाबत आक्रोश करत आहे. वाढते प्रदूषण, व्यापारी कारणांनी होणारे आक्रमण, विकास प्रकल्प, औद्योगीकरण, पर्ससीन नेटने होणारी बेछूट मासेमारी, माशांच्या प्रजनन काळातही पुरेशी सुट्टी न घेणं अशी अनेक कारणं यामागे आहेत. त्यावर उपापयोजना करण्याऐवजी कच्चातिवूसारख्या जुन्या मुद्द्याला निवडणुकीच्या तोंडावर हवा दिली जातेय. यातून मच्छिमारांसाठी काहीही साध्य होण्याची चिन्हं नाहीत.खोल समुद्रातील मासेमारीला सध्या तरी पर्याय नाही. यासाठी मच्छिमारांना निधी, प्रशिक्षण आवश्यक आहे. भारतीय हद्दीत नैसर्गिकरित्या माशांची पैदास वाढावी, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. माशांच्या प्रजनन काळात मासेमारी बंदीचा काळ वाढवण्याचा पर्याय त्यासाठी असू शकतो. समुद्रातल्या सर्वांत जवळच्या बिंदूवर भारत आणि श्रीलंका केवळ १० नॉटिकल मैल किंवा १८.५ किमी दूर आहेत. तमिळ वंशाचे दोन्हीकडचे अनेक लोक एकमेकांचे नातेवाईक आहेत. भाऊ भारतात, बहिणी श्रीलंकेत अशीही उदाहरणे आहेत; या मुद्द्यावर तर चर्चाही होत नाही. दुसरीकडे श्रीलंकेच्या नौदलाची कठोर कारवाई सुरूच आहे. आता श्रीलंकेचे मच्छिमारही भारतीय मच्छिमारांवर हल्ले करत असताना केंद्र सरकारने आपल्या सागरी सीमेशी संबंधित समस्यांकडे लक्ष देऊन मच्छिमारांच्या हक्कांचं रक्षण केलं पाहिजे. परदेशी तुरुंगात बंद असलेल्या भारतीय मच्छिमारांची सुटका करण्यासाठी अधिक कृतिशील असलं पाहिजे. हा केवळ श्रीलंका आणि तामिळनाडूचा मुद्दा नाही, भारत-पाकिस्तान दरम्यान गुजरात, महाराष्ट्र आणि दिवचे मच्छिमारही पकडले जातात. तर बांगलादेशच्या सागरी सीमेवरही असाच संघर्ष होत असतो.एकीकडे भारताच्या सागरी हद्दीतली मासळी वेगाने कमी होत असताना मच्छिमारांचं जगणं आधीच संकटात आहे. अशावेळी त्यांना समुद्रावर किमान सुरक्षा देण्याची जबाबदारी सरकारने घ्यायला हवी. राजकारण करायला गरीब मच्छिमारांपेक्षा वेगळे अनेक मुद्दे आहेत.

# रब्बीला तडाखा

लोकनेता न्यूज नेटवर्क

उष्णतेची लाट ओसरल्याने यंदा अवघा महाराष्ट्र गुढीपाडव्याच्या पर्वावर थोडा आनंदला होता. मात्र नेमक्या नव्या वर्षारंभालाच अवकाळी पावसाने आक्रमण करून या उत्साहावर चांगलेच विरजण घातले. मागील तीन दिवसांपासून राज्याच्या अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह तुफान पाऊस झाला. गारपिटीने बळीराजाची काळजी आणखीच वाढवली. अस्मानी संकटाच्या तडाख्यात पिके गारद झाली. विजांच्या कडकडाटाने काही जीव गेले. हा प्रहार जनावरांवरही बरसला. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता होतीच.

ऑरेंज ॲलर्टही देण्यात आला होता. पिकांवरील मारा मात्र अपेक्षेहून अधिक झाला. मुसळधार पावसाने दाणादाण उडविली. विदर्भात ५० हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. खान्देशातील जळगाव आणि नजीकच्या परिसरातील तडाखाही मोठा आहे. रब्बी हंगामातील पिके हातची गेली. फळबागांना पावसाने झोडपून काढले. गव्हाचे पीक झोपविले. संत्र्याची दैना केली. केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या. ज्वारी, हरभऱ्याकडे



डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आणले. आंबाही जमिनीवर आला. राज्याची एकूण हानी लवकरच हाती येईल. असाच तडाखा मागच्या वर्षी मार्चमध्ये बसला होता. तसाही मार्च हा आपल्याकडे ऋतुबदलाचा महिना असतो. या महिन्यात अवकाळी पाऊस होतोच. अनेक वर्षांनंतर यंदा मात्र ही स्थिती एप्रिलमध्ये उद्भवली. समुद्री आणि जमिनी तापमानात फरक पडल्यास कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन एल निनोसारखी अवस्था येते. यंदा समुद्री तापमानातील बदल प्रामुख्याने जाणवला. एल निनो मजबूत असल्याने मध्य भारतात वादळी पावसाचा जोर अधिक दिसला.।गरी सुधारणा आणि अत्यावश्यक संरचनेच्या नावावर होणाऱ्या मानवनिर्मित बदलामुळे जमिनीचे वाळवंटीकरण वाढले आहे. समुद्री वारे वारंवार येतात. त्यातून निसर्गाचे वेळापत्रक कोलमडले आहे. या बदलांमुळे ‘अर्बन हिट आयलंड’ म्हणजेच उष्णतेची बेटे आता शहरांवर तयार होऊ लागली आहेत. ‘थर्मल इमेज’ बघितल्या तर ते प्रकर्षाने लक्षात येते. अतिवृष्टी आणि ढगफुटी यांचेही प्रमाण शहरांवर होण्यामागे नेमके हेच कारण आहे. औद्योगिकरणामुळे होणाऱ्या उत्सर्जनातून ही चिंता वैश्विक झाली आहे. निर्धारित वेळेत पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश राज्य प्रशासनाने दिले आहेत. पीक लागवडीमधील वैविध्याची मात्रा लागू करण्यातही प्रशासनाने पुढाकार घ्यायला हवा. राज्यातील निवडणूक ज्वराचा ताप मदतीतील दिरंगाईतून दिसू नये, एवढीच अपेक्षा आहे.

# मार्च-२०२४ मध्ये पंकजाताई व धनंजय मुंडे बहीण-भाऊ राजकारणात एकत्र येणार असे २०२० मध्ये भाकीत करणारे राजेंद्र महाराज लोखंडे

## आष्टी विधानसभा मतदार संघात धस,आजबे व धोंडे एकत्रीतच राहणार भविष्यातील भाकीत

लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा येथील राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला एक अदभुत किमया अवगत आहे. लोखंडे महाराज आपल्या अदभुत लॉजीकने पुढील व मागील अनेक वर्षामधील सणावारांच्या तारखा अगदी अचुकपणे सांगतात. एवढेच नाही तर समोरील माणसांच्या जन्मतारखा देखील वारासह सांगतात. पाटोदा जवळ असलेल्या दिघोळ येथील राजेंद्र गंगाराम लोखंडे हे काही वर्षांपूर्वी शिक्षण व कामाच्या निमीत्ताने पाटोदा शहरात आले आणि येथेच स्थायिक झाले. शाळेत असल्यापासुनच राजेंद्र लोखंडे हे अध्यात्मिक वृत्तीचे आहेत. काहीसे गुढ वागत, त्या वेळी खेमानंद महाराज यांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले होते. पाटोद्यात आल्यानंतर त्यांनी एम.ए. पर्यंतचे आपले शिक्षण पूर्ण करून काही काळ ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत नोकरी ही केली मात्र त्यांच्या अध्यात्माकडेच अधिक कल राहीला. महाराज ब्रम्हचारी आहेत, दरम्यान त्यांच्या या गुढ वागणुकीतुनच त्यांच्यातील अनोख्या तर्कशक्तीची जाण होऊ लागली. एकादा अनोळखी व्यक्ती जरी त्यांच्या समोर गेला आणि त्यांना वाटले तर ते व्यक्तिची जन्मतारीख वारासह अगदी अचुकपणे सांगतात. त्याच प्रमाणे त्यांच्या तारखेच्या तर्कशास्त्रानुसार त्या व्यक्तिच्या जीवनात भविष्यात घडू शकणाऱ्याही काही घटनांचा वेध सांगु शकतात. वर्तविलेले अंदाज खरे ठरू लागले आहेत. पालकमंत्री धनजंय मुंडे व लोकनेत्या पंकजाताई मुंडे हे बहीण-भाऊ मार्च-२०२४ मध्ये राजकारणात एकत्रीत येतील

### राजकीय नेते लोखंडे महाराजांना विचारून लढतात निवडणूक ....

राजेद्र महाराज लोखंडे यांचा सर्व विषयातील भविष्यवाणीचा विचार करून प्रस्थापित राजकीय पुढारी देखील त्यांना विचारल्या शिवाय निवडणूक लढवत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कडे मोठ्या प्रमाणावर राजकीय मंडळींची गर्दी दिसून येते. विशेष म्हणजे काही राजकीय लोकांनी त्यांचा अनुभव देखील घेतला असून त्यांच्या बाबतीत महाराजांनी सांगितलेली भविष्यवाणी खरी ठरलेली आहे.



असा २०२० साली भविष्य सांगणारे लोखंडे महाराज आहेत. मुंडे बहीण भाऊ एकत्र येतील असे केलेले भाकीत आज तंतोतंत खरे ठरलेले आहे. दैनिक झुंजार नेता प्रस्तुत प्रतिनिधीने आष्टी विधानसभा मतदार संघात विधानसभा निवडणुकीत काय चित्र राहील? असे विचारले असता आ.धस, आ.आजबे आणि माजी आ.धोंडे हे एकत्रीतच राहतील असे भाकीत केले आहे. क्षीरसागर कुटुंब भविष्यात एकत्र येणार नाही. पंडित कुंटुबातील एका पंडितास मागच्या दाराने राजयोग असल्याचे लोखंडे महाराज यांनी सांगितले. मानवी जीवनातील गूढ वागुणकीचे तर्कशास्त्र लोखंडे महाराज यांना अवगत आहे. मनुष्याचा फक्त चेहरा पाहून ते जन्मतारखेपासून, मृत्युच्या तारखेपर्यंतचा जीवनपट सांगतात, लोखंडे महाराजांनी राज्याच्या व बीड जिल्हयाच्या राजकारणावर आपले अंदाज व मत नोंदवले. सध्या आहे तशीच परिस्थिती विधानसभा निवडणुकीनंतर राहणार आहे. मात्र मुख्यमंत्री भाजपाचा असेल असे महाराज सांगतात. मुंडे बहीण-भाऊ एकत्र येतील असे भाकीत महाराजांनी २०२० मध्ये केले होते. ते आज खरे ठरले आहे, बीड जिल्ह्याच्या राजकारणावर महाराजांनी अनेक धक्कादायक अंदाज बांधले आहेत. परळीचे मुंडे कुटुंब एकत्र आले असले तरी बीडचे क्षीरसागर कुटुंब एकत्र येणार नाही. बीडचे माजी मंत्री भाजपाकडून आमदार होतील असे ही त्यांचे भाकीत आहे. तीन-चार विद्यमान आमदारांना धोका नाही. मात्र गेवराईचा एक पंडित मागच्या दाराने विजयीभव असल्याचे ते सांगतात. मराठा आरक्षणाचा पूर्ण प्रश्न विधानसभा निवडणुकीनंतर सुटलेला असेल असे लोखंडे महाराजांनी सांगितले. संतती व बोअरच्या पाण्याविषयी ही लोखंडे महाराज यांचे भाकीते खरे ठरत असल्याने त्यांचे कडे विचारणा करणाऱ्याची संख्या वाढली आहे. २०४० साली नोव्हेंबर महीन्यात ४ तारखेला दिवाळी आहे त्या दिवशी रविवार असेल, २०५५ साली २४ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री बुधवार रोजी असेल, १९४७ साली ६ मार्च रोजी होळीचा सण होता. तो दिवस बुधवारचा होता, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तो वार शुक्रवार होता अशा प्रकारे पुढील व मागील ५० वर्ष आणि त्याही पेक्षा अधिक वर्षातील सणांच्या तारखा अगदी क्षणात कुणी बिनचुक सांगु शकेल या वर कोणाचा चटकन विश्वास बसणार नाही मात्र पाटोदा येथील राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला मात्र ही अदभुत किमया अवगत असुन ते आपल्या अदभुत लॉजीकने पुढील व मागील अनेक वर्षामधील सणावारांच्या तारखा अगदी अचुकपणे सांगतात, एवढेच नाही तर समोरील माणसांच्या जन्मतारखा देखील वारासह सांगतात. पाटोदा शहरापासुन जवळ असलेल्या दिघोळ येथील राजेंद्र गंगाराम लोखंडे हे काही वर्षांपूर्वी शिक्षण व कामाच्यानिमीत्ताने पाटोदा शहरात आले व येथेच स्थाईक झाले शाळेत असल्यापासुनच राजु लोखंडे हे अध्यात्मिक वृत्तीचे आहेत. मनुष्याच्या जीवनात प्रत्येक शास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जन्म-मृत्यूचा फेरा हा कोणालाही चुकविता आलेला नाही परंतु याच जन्म-मृत्यूच्या संदर्भात जर एखाद्या व्यक्तीने तुम्हाला काहीही न पाहता अचूकपणे सांगितले तर आहे की नाही आश्चर्य जामखेड तालुक्यातील दिघोळ या गावी अशाच एका अवलियाने जन्म घेतला आहे. आपल्या जीवनाशी संदर्भात असलेली घटना, जन्म, मृत्यू आणि घडणाऱ्या घटना हे अचूकपणे सांगण्याचे काम ४० वर्षीय लोखंडे महाराज करत आहेत.राजेंद्र गंगाराम लोखंडे हल्ली मुक्काम पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाकडे जाणाऱ्या रोडवर ते राहतात. ब्रह्मचारी अवस्थेत असलेले लोखंडे महाराज यांचे शिक्षण दहावीपर्यंत दिघोळ येथे झाले आहे. महाविद्यालयीन शिक्षण पाटोदा येथे झाले आहे. बालवयातच लोखंडे महाराजांवर धार्मिक संस्कार झाले असल्यामुळे अध्यात्माची चांगल्या प्रकारे त्यांना आवड निर्माण झाली आहे. भगवान शंकराचे ते भक्त आहेत. त्यांना भविष्य जाणण्याची विद्या प्राप्त झाली आहे. माणसाचा जन्मदिनांक, वेळ, तारीख ते अचूकपणे सांगतात तर मृत्यूची तारीख आणि वेळ सुध्दा सांगतात. फक्त त्या व्यक्तीची ऐकण्याची मानसिकता असायला हवी. आपल्याकडे हस्तरेषा किंवा चेहरा पाहून भविष्य सांगणारी माणसं आहेत पण ज्योतिष शास्त्राचा कसलाही अभ्यास न करता लोखंडे महाराज माणसाच्या जीवनाबाबत ज्या गोष्टी सांगतात हे मात्र आश्चर्यपेक्षा कमी नाही.

–उत्तम बोडखे, आष्टी, जि.बीड.

# ही निराशा निर्णायक!

लोकनेता न्यूज नेटवर्क

राज ठाकरे यांनी शिवतीर्थावर गुढी पाडव्याच्या दिवशी नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. हा पाठिंबा बिनशर्त देताना त्यांनी मोदींकडून तरुणांसाठी काही तरी करण्याची अपेक्षा मोघमपणे व्यक्त केली. पण या सगळ्याचा राज ठाकरे व त्यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला नक्की काय फायदा होणार, याची उत्तरे मात्र ते या सभेत देऊ शकले नाहीत.

राज ठाकरे यांनी शिवतीर्थावर गुढी पाडव्याच्या दिवशी नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. वास्तविक राज ठाकरे याच दिशेने जात असल्याचे दिसतच होते. त्यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले एवढेच. हा पाठिंबा बिनशर्त देताना त्यांनी मोदींकडून तरुणांसाठी काही तरी करण्याची अपेक्षा मोघमपणे व्यक्त केली. पण या सगळ्याचा राज ठाकरे व त्यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला नक्की काय फायदा होणार, याची उत्तरे मात्र ते या सभेत देऊ शकले नाहीत. इतकेच नव्हे तर ‘लाव रे ते व्हिडीओ ते बिनशर्त पाठिंबा’ हा प्रवास का आणि कसा झाला, याचेही समर्पक उत्तर त्यांनी दिले नाही. त्यांच्याकडून निराशा पदरी पडण्याचे प्रसंग आधीही आले आहेत; परंतु, यावेळी त्यांनी केलेली निराशा निर्णायक असल्याचा सार्वत्रिक सूर उमटतो आहे.

अर्थात, अशा पद्धतीने निर्णय घेण्याची त्यांची ही पहिली वेळ नव्हे. या पूर्वीही त्यांनी अनेकदा, आपला पक्ष निवडणुकीत सहभागी होणार नाही, असे जाहीर करून समर्थकांना धक्के दिलेले आहेतच. १८ वर्षांपूर्वी राज ठाकरे यांनी नवनिर्माणाची नवीन राजकीय चूल मांडली; तेव्हा महाराष्ट्राच्या राजकीय अवकाशात ते भरीव स्थान मिळवतील, अशी आशा वाटत होती. इतकेच नव्हे तर पहिल्या काही वर्षांत त्यांना निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशामुळे त्या अपेक्षेला धुमारेही फुटत होते. पण राजकारण हा सोयीने किंवा सवडीने करण्याचा उद्योग नव्हे. गेल्या दहा वर्षांत तर नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांनी राजकारण हा वर्षाच्या प्रत्येक दिवशी, तोही २४ तास करण्याचा उद्योग आहे, हे दाखवून दिले आहे. त्यामुळे ९० टक्के समाजकारण व १० टक्के राजकारण असे म्हणणाऱ्यांपासून ते राजकीय संस्कृती जपण्याच्या नावाखाली स्वतःचे स्वार्थ लपविणाऱ्या अनेक नेत्यांची चांगलीच पंचाईत झाली आहे. मोदी-शहांचा हा अहोरात्र चालणारा उद्योग अनेकांना नकोसा वाटला तरी काळाची तीच गरज आहे. किंबहुना त्याच जिवावर भाजपचे आजचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुढच्या काळात कोणत्याही पक्षाला सत्तेचे राजकारण करताना याच मार्गावरून पुढे जावे लागेल. कारण जनतेने त्यांचे परतीचे दोर कापून टाकले आहेत. या स्थितीला मग राज ठाकरे तरी अपवाद कसे ठरतील? राज ठाकरे हे मनस्वी नेते आहेत. अनेक क्षेत्रांमध्ये त्यांना गती आहे. त्यांचा तसा वावर असतो. ही त्यांची जमेची बाजू आता मात्र अडचणीची ठरत आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही आपली अशीच प्रतिमा जपली होती. मात्र, त्या काळाने त्यांना ते स्वातंत्र्य दिले होते. त्यांच्या समोर त्या काळात २४ तास सत्ताकारण करणारे विरोधक नव्हते. आता तो आदर्श ठेवता येणार नाही, हा धडा सामान्य जनतेने घेतला आहे. राज ठाकरे तो धडा कधी घेणार, हाच प्रश्न आहे.

‘माझ्या विठ्ठलाभोवती बडव्यांचा गराडा पडला आहे’ अशी खंत व्यक्त करून राज ठाकरे शिवसेनेच्या बाहेर पडल्यावर राज यांच्या भोवतीही बडवे गोळा झाले. त्यांना स्वतःला मात्र ‘नवा विठ्ठल’ होता आलेले नाही. नेतृत्व करणे आणि संघटना बांधणे या दोन स्वतंत्र गोष्टी असतात. संघटना बांधण्यासाठी नेत्याच्या आसपास पाच-पंचवीस नेते असावे लागतात. ते भले त्याच्यापेक्षा ‘कमी उंचीचे’ का असेनात! राज यांच्या भोवती असे नेते कधीच गोळा झाले व टिकले नाहीत. त्यांनी तसे प्रयत्न केले नाहीत. ‘कार्यकर्त्यांनी विधानसभेची तयारी करावी’ असे आवाहन करून त्यांनी ‘छोटीशी आशा’ दाखवली आहे. कदाचित, तोवर ते तरुणांच्या अपेक्षांचा आराखडा तयार करतीलही. ‘जे अपत्य मी जन्माला घातलं, तेच मी वाढवणार, त्याचं संगोपन करणार’ असे राज यांनी शिवाजी पार्कच्या सभेत सांगितले; पण अपत्य विशीत येत असताना असे सांगावे लागणे, हे चांगले लक्षण नव्हे. आपले अपत्य राज यांनी कधी नीट कडेवर घेतलेच नाही, म्हणून लोकांना असे वाटते की राज यांना अजूनही शिवसेनेचे नेतृत्व करण्याची इच्छा असावी. ‘राज शिवसेनेत परत जातील किंवा उद्धव-राज एकत्र येतील’ अशा भाबड्या अपेक्षांवर श्रद्धा असलेली गर्दी जर जमा होणार असेल तर ती किती पोकळ आहे, हे वेगळे सांगायला नको. तरुणांच्या अपेक्षांचा उल्लेख करून आपल्या नेतृत्वाची तरुणाई मनावर ठसवण्याचा कदाचित राज यांचा प्रयत्न असेल, परंतु त्यांना खरेच विधानसभा लढवायची असेल तर त्यांनी तरुणाईतून बाहेर पडून आता प्रगल्भ झाले पाहिजे. जीसटी, जीडीपीपासून ते शिक्षण, रोजगार यावर सविस्तर बोलले पाहिजे. आपल्या पक्षाला महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकीय पटलावर अधिक महत्त्वपूर्ण स्थान मिळवून द्यायचे असेल, तर आता तरी त्यांना या गोष्टी गंभीरपणे कराव्या लागतील. त्याचबरोबर सोबत राहणाऱ्या कार्यकर्त्यांना काही तरी मिळवून द्यावे लागेल. दरवेळी बिनशर्त पाठिंबा किंवा निवडणुकीत सहभाग नाही, हे धोरण त्यांच्या व या पक्षाच्या हिताचे नाही.

## निवडणूकविषयक सर्व बाबींवर बारकाईने लक्ष ठेवावेत–निवडणूक खर्च निरीक्षक

# मतदार संघाच्या सीमांवर काटेकारेपणे तपासणी करण्याचे निर्देश अचूक नोंदीवर निवडणूक विभागाचा विशेष भर

### माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे ‘पेड न्यूज’वर विशेष लक्ष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूकविषयक सर्व बाबींवर बारकाईने लक्ष ठेवून खर्चाच्या अचूक नोंदी ठेवण्याच्या सूचना खर्चाचे निवडणूक निरीक्षक अन्वर अली व कमलदीप सिंह यांनी आज येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत दिल्या.

हिंगोली लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज निवडणूक खर्च निरीक्षक अन्वर अली व कमलदीप सिंह यांनी आढावा घेतला. यावेळी जिल्हास्तरीय खर्च नियंत्रण समितीचे पथक प्रमुख माधव झुंजारे, दिगंबर माडे, आयकर विभागाचे सहायक आयुक्त अशोक मंगनानी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक आदित्य पवार, वस्तू व सेवा कर विभागाचे सहायक आयुक्त दीपक खंदारे, सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक एस. एल. बोराडे, जिल्हा माध्यम व सनियंत्रण समितीचे पथक प्रमुख प्रभाकर बारहाते, पोलीस निरीक्षक शामकुमार डोंगरे, संपर्क अधिकारी गणेश वाघ, उबाळे, जिल्हा अग्रणी बँकेचे पांडे, किनवट आदिवासी प्रकल्प विभागाचे डी. आर. श्रृंगारे, हिंगोली, वसमत व कळमनुरीचे सहायक खर्च निरीक्षक सर्वश्री. एम. जी. वानखेडे, आर. ए. लांडे, एन. एस. राठोड आदी उपस्थित होते.

राजकीय पक्षाचे सनियंत्रण करण्यासाठी विविध समिती व भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये व्हिडिओ सनियंत्रण समिती (व्हीएसटी), व्हिडीओ पाहणारा चमू (व्हीव्हीटी), स्थिर संनियंत्रण चमू (एसएसटी), लेखांकन करणारा चमू, भरारी पथक, माध्यम प्रमाणीकरण आणि संनियत्रण समितीच्या पथक प्रमुखांनी खर्चाच्या नोंदी अचूक ठेवाव्यात. उमेदवाराने घेतलेल्या खर्चाचा ताळमेळ नोंदी व पथकप्रमुखाच्या नोंदी अचूक असल्याची बाब जाणीवपूर्वक तपासून घ्यावी. अभिरुप नोंदवहीतील नोंदी अद्यावत ठेवाव्यात. तसेच एसएसटी आणि एफएसटी या पथकांनी आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी. निवडणूक कालावधीमध्ये तपासणी नाक्यांवर तपासणी करताना कोणतीही दिरंगाई करू नये, कर्तव्यावर असलेल्या पथक प्रमुख आणि पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा केल्यास योग्य ती दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश हिंगोली, वसमत आणि कळमनुरीचे निवडणूक खर्च निरीक्षक अन्वर अली व उमरखेड, किनवट आणि हदगावचे विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक कमलदीप सिंह यांनी यावेळी सांगितले.

लोकसभा मतदार संघ व विधानसभा मतदार संघनिहाय सहायक निवडणूक खर्च निरीक्षकांनी दैनंदिन नोंदी त्याच दिवशी अभिरुप ताळमेळ नोंदवहीत अचूकपणे नोंदवाव्यात. यामध्ये अजिबात दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवारांचे निवडणुकीशी



संबंधित स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. उमेदवारांच्या बँक खात्यातून दैनंदिन काढण्यात येणाऱ्या रकमेवर बारकाईने लक्ष ठेवावेत. तसेच सर्व पथक प्रमुखांनी समन्वयाने काम करावेत. इतर विभागाशी संबंधित माहिती मिळाल्यास ती माहिती संबंधित विभागास कळवावी. जेणेकरुन त्याच्यावर कारवाई करणे सोयीचे होईल. तसेच मतदार संघात मद्य वाटप होणार नाही यावर लक्ष ठेवावे, अशा सूचना श्री. अन्वर अली यांनी दिल्या.

उमेदवारांकडून होणारे १० हजार रुपयावरील व्यवहार चेकने अथवा ऑनलाईन झाले पाहिजेत. यासाठी जिल्हा ग्रणी बँकेच्या व्यवस्थापकांनी लक्ष ठेवावे. लोकसभा मतदार संघातील सर्व बँकाकडून दहा लाख रुपयावरील रक्कमेच्या व्यवहाराची माहिती दररोज खर्च नियंत्रण समितीला सादर करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा अँग्रणी बँकेचे अधिकारी हे नोडल अधिकारी असून त्यांनी दररोज अहवाल पाठविणे आवश्यक आहे. अहवाल निरंक असला तरीही तसे निरंक अहवाल पाठवावेत. तसेच सहकारी बँकेच्या व्यवहाराची दररोजची माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेचे उपनिबंधकांनी दररोज पाठविणे आवश्यक आहे. या कामात हलगर्जीपणा केल्याचे आढळून आल्यास निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येईल, असे श्री. अन्वर अली सांगितले.

लोकसभा मतदार संघात कोठेही संशयास्पद अवैध मद्य विक्री व साठा, रोख रक्कमेचे वितरण, विविध साहित्य वाटप यासारखे अनुचित प्रकार होणार नाहीत, यासाठी बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी स्थिर संनियंत्रण (एसएसटी) पथकामध्ये वस्तू व सेवा कर विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, आयकर विभाग व पोलीस विभागाने प्रत्येकी एक कर्मचारी उपलब्ध करुन द्यावा. याबाबतचा दैनंदिन अहवाल सादर करावा. मतदार संघातील राज्याच्या सीमेवर असलेल्या आदिलाबाद, पिंपळगाव, उनकेश्वर व मारला गुंडा येथे तपासणी नाक्यावर सर्व संबंधित विभागाचे प्रत्येकी एक कर्मचारी उपलब्ध ठेवावा. सीमेवर येणाऱ्या वाहनाची कसून तपासणी करावी. सीसीटीव्ही मॉनिटरींग वाढवावी. काही अनुचित प्रकार आढळून आल्यास त्याचा अहवाल तात्काळ सादर करावा. तसेच एसटी बसेस व रेल्वे स्टेशन येथे तपासणी पथक नेमून रोख रक्कम, साहित्य आदी विविध बाबींची कसून चौकशी करावी, असे निर्देश श्री. अन्वर अली यांनी दिले.तसेच जिल्हास्तरीय माध्यम व सनियंत्रण समितीने समाज माध्यम व वृत्तपत्रातील पेड न्यूजवर लक्ष ठेवावेत. पेड न्यूजबाबत संबंधित उमेदवारांना नोटीस द्यावेत. त्याचा अहवाल दररोज खर्च नियंत्रण समितीला सादर करावा. तसेच समाज माध्यमावर येणाऱ्या पेड न्यूजबाबत काही तक्रार असल्यास जिल्हास्तरीय माध्यम व सनियंत्रण समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, हिंगोली येथे द्यावी. तसेच सी–व्हीजील पवर माहिती द्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

# वडगाव दादाहरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सामाजिक उपक्रमाने साजरी

### विद्यार्थ्यांना वह्या व पेन वाटप; बहुजन विकास मोर्चाचा उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती परळी तालुक्यातील मौजे दादाहरी वडगाव येथे आज गुरुवार दिनांक १८ एप्रिल रोजी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली व परळी शहराध्यक्ष मनोहर मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त शेकडो गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य वही व पेन वाटप करण्यात आले.



परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे दादाहरी वडगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती गुरुवार दिनांक १८ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहणही करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते भास्कर नाना रोडे, प्रा दासू वाघमारे सर, राजन वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही व पेन वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास मौजे दादाहरी वडगाव व पंचक्रोशीतील विद्यार्थी पालक, बहुजन विकास मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व आंबेडकर प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांचे आभार बहुजन विकास मोर्चाचे शहराध्यक्ष मनोहर उर्फ बंडू मुंडे यांनी केले आहे.

---

# सावरगाव सर्कल मधून नरेंद्र खेडेकर यांना उस्फूर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । प्रतिनीधी**

सावरगाव मुंढे पंचायत समिती सर्कल मधून महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.लोणार १७ सावरगाव मुंडे पंचायत समिती सरकल मधील देऊळगाव वायसा, गोत्रा, शिवनी जाट, सोनुना, गंधारी, मढी, रायगाव, नांद्रा, खुरमपूर, धाड या गावांमधून महाविकास आघाडीचे उमेदवार प्राध्यापक नरेंद्र खेडेकर यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे त्यांच्या गावातील मिरवणुकीत मोठ्या संख्येने गावकरी मतदार राजा उस्फुर्तपणे सहभागी होत आहे आणि गावात निघालेल्या मिरवणुकीचे रूपांतर सभेत होत आहे आणि या सभेत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेश मापारी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे सदानंद पाटील, शिवसेनेचे शहर प्रमुख गजानन जाधव, सुदन अंभोरे, शिवसेना महिला आघाडी जिल्हा



उपप्रमुख संजीवनीताई वाघ, युवा सेनेचे तालुकाप्रमुख जीवन घायाळ, आम आदमी पार्टीचे जिल्हा सरचिटणीस गणेश सोलंकी यांची आक्रमक भाषणे होत आहेत

या प्रचारदौऱ्यात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेश मापारी शहराध्यक्ष शेख समद, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे जिल्हाध्यक्ष सदानंद पाटील तेजनकर, शहराध्यक्ष वाजिद खान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे तालुकाप्रमुख एड दीपक मापारी शहर प्रमुख गजानन जाधव सुदन अंभोरे यांची प्रामुख्याने भाषणे झाली याप्रसंगी,काँग्रेसचे भूषण मपारी, विठ्ठलराव नागरे, ज्ञानेश्वर चिभडे मामा, विजय मोरे, टेजराव घायाळ, सतीश राठोड, परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, वाजिद खान, तौफिक कुरेशी, प्रदीप संचेती, विकस मोरे, अंबादास इंगळे, जीवन घायाळ, राजूभाऊ बुधवत, इक्बाल कुरेशी, लूकमान कुरेशी, समाधान ठाकरे, निलेश चव्हाण, श्रीकांत मदनकर अश्रुबा धारकर छगन काळे आम आदी पक्षाचे आम आदमी पार्टीचे अशोक जाधव, उमर सय्यद, गणेश सोळंके, विशाल, चव्हाण, दत्ता डाखोरे, गोपाल खोतकर, तानाजी अंभोरे, तानाजी मापारी, राजू दहातोंडे किरण कमडे, सोमेश गुत्ते, गणेश पाठे, प्रसेनजित बशिरे, जयकुमार जारे, यांच्यासह मोठ्या संख्येने माहविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

---

# निवडणुकीचे दैनंदिन लेखे सादर न केलेल्या उमेदवारांना नोटीस

### ४८ तासाच्या आत खर्च सादर न केल्यास उमेदवारांवर होणार कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । प्रतिनिधी**

१५–हिंगोली लोकसभा मतदार संघ सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने उमेदवाराने किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीने निश्चित केलेल्या दिवशी निवडणूक खर्च नोंदवही व प्रमाणके तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. लोकसभा निवडणुकीकरिता आपला होणारा दररोजचा खर्च सनियंत्रण पथकास दि. १५ एप्रिलपर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

परंतु ड. शिवाजीराव जाधव, विजय ज्ञानोबा राऊत, ड. रवी शिंदे, बाबूराव आनंदराव कदम, दत्ता श्रीकृष्ण सुर्यवंशी, आनंद राजाराम धुळे, अनिल देवराव मोहिते, श्रीमती वर्षा देवसरकर, अशो पांडूरंग राठोड, सुनिल मोतीराम गजभार या उमेदवारांनी नोंदवही व खर्चाचे प्रमाणके तपासणीसाठी दि. १५ एप्रिलपर्यंत सादर केले नाहीत. त्यामुळे संबंधित उमेदवारांनी त्यांचा खर्च तात्काळ सादर करावा.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम ७७ अन्वये खर्चाचे दैनंदिन लेखे ठेवण्यात कसूर केल्यामुळे ही नोटीस प्राप्त झाल्यापासून ४८ तासाच्या आत निवडणूक खर्चाचे लेखे निवडणूक सनियंत्रण कक्ष, जिल्हा कोषागार कार्यालय, हिंगोली येथे सादर करावे. विहित मुदतीत खर्च सादर न केल्यास भादंवि कलम १७१ (१) अन्वये तक्रार दाखल करण्यात येईल. तसेच वाहने, सभा इत्यादीसाठी देण्यात आलेल्या सर्व परवानग्या तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, याची नोंद घ्यावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत.

---


## सुफियान मणियार, समीर सरकार आदीं नवतरुणांच्या मागणीला पाटोद्यातुन पाठिंबा

# उमेदवारांनी मुस्लिम समाजाविषयी आपली भूमिका स्पष्ट करावी–शेख जावेद,मोसिन भाऊ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाचा सर्वच राजकीय पक्ष आप आपल्या पद्धतीने गृहीत धरून प्रचार करत असले तरी मुस्लिम समाजाचे प्रश्न आज ही अनुत्तरीत आहेत जातीय समीकरणात मुस्लिम समाज हा सामाजिक विघटनातून बाहेर फेकलेला असुन सद्य: स्थित राजकीय गणितात समाजाची नोंद ही बेदखल असल्याची खंत नवतरुणांना जाणवत असल्याने बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजातील सामाजिक चळवळीतील अग्रेसर असणारे सुफियान मणियार, समीर सरकार, इम्रान शहा आदी नवतरुणांनी लोकसभा निवडणुकीला





सामोरे जाणाऱ्या प्रमुख पक्षाच्या उमेदवारांनी मुस्लिम समाजाच्या मुख्य आणि महत्वपूर्ण प्रश्नांवर, समस्यांवर, व विकासात्मक धोरणांवर आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी करत मुस्लिम समाजाचा जाहीरनामा तयार करून बीड लोकसभेच्या सर्व पक्षीय उमेदवारांना भेटुन मुस्लिम समाजा विषयी आपली भूमिका स्पष्ट करण्या संदर्भात मागणी करणार आहेत. या बाबतीत बीड जिल्ह्यातुन या तरूणांच्या निर्णयाचे स्वागत करत पाठिंबा दर्शविण्यात येत आहे. कारण की बीड लोकसभा मतदारसंघात ३ लाखापेक्षा जास्त मुस्लिम मतदार असुन कोणत्या ही विजयी उमेदवारांना हे मतदान निर्णायक ठरणारे असले तरी प्रमुख पक्षाच्या उमेदवारांकडून मुस्लिम समाजाच्या प्रमूख समस्या व प्रश्नावर कानाडोळा करणे सुरू आहे. उमेदवारांनी मुस्लिम आरक्षण, शिक्षण व संरक्षण विकासात्मक धोरणावर आपली भूमिका स्पष्ट करावी. या बद्दल नवतरुणांनी घेतलेली भुमिका योग्य असुन पाटोदा तालुक्यातुनही मुस्लिम समाजाचा पाठिंबा देण्यात आला असल्याचे समजिक कार्यकर्ते शेख जावेद, मोसिन भाऊ यांनी जाहीर केले आहे. तरी सर्व पक्षीय उमेदवारांनी मुस्लिम समाजाविषयी आपली भुमिका स्पष्ट करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

---

# शेतातून अवैध वाळूची वाहतूक करू नका म्हणल्यावर शेतकऱ्याला जीवे मारण्याची व ट्रॉसिटी करण्याची धमकी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कौसडी । प्रतिनिधी**

शेतातून अवैध वाळूची वाहतूक व साठा करू नका म्हणल्यावर शेतकऱ्याला जीवे मारण्याची व ट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्याचा प्रकार दिनांक १६ एप्रिल रोजी घडला आहे.

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथून जवळ असलेल्या दुधनगाव येथील शिवाजी प्रकाशराव भोंडवे यांची शेत जमीन दुधनगाव शिवारात गट नंबर ११२ मध्ये आहे.शेताच्या बाजूला दुधना नदी गेलेली असून या दुधना नदीच्या पात्रातून अमोल अशोकराव सोनपसारे,अशोकराव कचरुबा सोनपसारे, कोंडीराम अशोकराव सोनपसारे हे अवैध वाळूचा उपसा करून शिवाजी प्रकाशराव भोंडवे यांच्या शेतातून वाहतूक व वाळूचा साठा करत आहे. शिवाजी प्रकाशराव भोंडवे यांनी अमोल सोनपसारे यास आमच्या शेतातून वाळूची वाहतूक व साठा करू नका असे म्हणल्यावर अमोल व त्याचा भाऊ कोंडीबा यांनी शिवाजी भोंडवे यांना तुमच्या शेतातून कसे वाळूची वाहतूक करू देत नाही ते बघतो एखाद्याला ट्रॅक्टर खाली घालून जीवे मारतो नाहीतर तुमच्यावर ट्रॉसिटी गुन्हा दाखल करून तुम्हाला जेलमध्ये घालतो जेणेकरून तुम्ही जेलमध्ये गेल्यावर मी तुमच्या शेतातून अवैध वाळूची वाहतूक करतो व मला कोणी अडवणार नाही अशी धमकी दिल.

जीवे मारण्याची व ट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्यामुळे शिवाजी प्रकाशराव भोंडवे यांनी तात्काळ उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे.या निवेदनावर शिवाजी प्रकाशराव भोंडवे यांची स्वाक्षरी आहे. निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केल्यानंतर पोलीस प्रशासन यावर काय दखल घेते याकडे लक्ष लागले आहे.

## रावेर लोकसभा मतदार संघाचा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

# २१- मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये आचारसंहिता अंमलबजावणीकरीता प्रशासन सज्ज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर येथील तहसील कार्यालयाच्या शासकीय दलनात पत्रकार परिषद घेऊन लोकसभा निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी होणाऱ्या निवडणुकी बद्दल विसंभुत माहिती देत पत्रकारांना ही निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरायचा असल्याचे आवाहन केले







भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता घोषित झालेली आहे. त्यानुसार ०४-रावेर लोकसभा मतदार संघांतर्गत २१ मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये दिनांक १३/०५/२०२४ रोजी मतदान होणार आहे. २१ मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये मलकापूर व नांदुरा तालुक्याचा समावेश होतो. २१- मलकापूर विधानसभा मतदार संघात एकूण ३०४ मतदान केंद्र असून, त्यापैकी ग्रामीण भागात २१४ मतदान केंद्र असून, शहरी भागात ९० मतदान केंद्र आहेत. ०४- रावेर लोकसभा मतदार संघाचा निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक १८/०४/२०२४ ते २५/०४/२०२४ पावेतो नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा कालावधी आहे. मतदान दिनांक १३/०५/२०२४ रोजी सकाळी ७:०० ते सायंकाळी ६:०० या कालावधीत होईल.

२१ मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये दिनांक २३/०१/२०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या मतदार यादी नुसार पुरुष १,४५,८४३ स्त्री १,३२,२३१, तृतीयपंथी ६, असे एकूण २,७८,०८० मतदार आहेत. त्यापैकी मलकापूर तालुक्यात पुरुष मतदार ७२१८४, स्त्री मतदार ६६५१३ तृतीय पंथी मतदार ०४ असे एकुण १३८७०१ व नांदुरा तालुक्यात पुरुष मतदार ७३६५९, स्त्री मतदार ६५७१८ तृतीय पंथी मतदार ०२ असे एकूण १३९३७९ असे मतदार आहेत. २१ मलकापूर विधानसभा मतदार संघात एकूण २५०२ दिव्यांग मतदार व ८५+ मतदार ३१७१ आहेत. त्यापैकी दिव्यांग मतदार ८४ व २२४ वयोवृध्द ८५+ मतदार असे एकूण ३०८ मतदारांनी गृह मतदाना करीता टपाली मतपत्रिका मिळणे बाबत अर्ज दिलेले आहेत. एकूण ३०७ मतदारांचे टपाली मतपत्रिकेव्दारे गृह मतदान होणार आहे. त्याकरीता एकूण १५ मतदान पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करावयाची असल्याने २१ मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये वेबकास्टींगसाठी १५२ मतदान केंद्र निश्चित करण्यात आलेले आहेत.

आचार संहितेची अमंल बजावणी करण्या करीता ७ फिरते पथक, ७ स्थिर सर्वेक्षण पथक, ४ फिरते व्हीडीओ सर्वेक्षण पथक, । व्हीडीओ पाहणी पथक, २ खर्च निरीक्षण पथक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. रणथम, जांबुळधावा, धुपेश्वर, दाताळा, अंभोडा, येरळी व तरवाडी या ७ ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आलेले आहेत, आचारसंहिता अंमलबजावणीकरीता सौविजित्न अंतर्गत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला असून, २४द७ अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियंत्रण कक्षाचा संपर्क क्र. ९४२०७१२८७ हा आहे.लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचे कामकाज पार पाडण्या करीता २१ मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ३० क्षेत्रीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे मतदानाची प्रक्रिया पार पाडण्याकरीता एकूण १३८८ मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, तरोच एकूण ५३ गुदम निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर मतदान पथकांना ने-आण करण्यासाठी ३२ वस, १२ मिनी बस, व १८ जीप निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सदर मतदान साहित्याचे वितरण व संकलन हे कृषी उत्पन्न बाजार समिती, मलकापूर नविन मार्केट यार्ड बेलाउ येथून करण्यात येणार आहे.महिला मतदारांची नोंदणी वाढावी तसेच तरुण मतदारांचे प्रमाण वाढावे याकरीता स्वीप अंतर्गत २१- मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये शाळा, महाविद्यालांमार्फत जनजागृती करण्यात येत आहे. त्यामुळे महिलांचे मंतदार यादीतील प्रमाणे ८९८ वरुन ९०९ इतके झाले आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी याकरीता मागील निवडणूकीमध्ये मतदानाची कमी टक्केवारी असलेल्या मतदान केंद्रांच्या ठिकाणी मतदार जनजागृतीकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच शहरातील वर्दळीचे ठिकाणी व महसूल मंडळांचे ठिकाणी मतदार जनजागृतीचे बॅनर, पथनाटये, रॅलीज्, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, मानवी साखळीचे संदेश, इत्यादी प्रकारे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.सदर निवडणूकीचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी अंकुश पिनाटे अपर जिल्हाधिकारी जळगांव, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष शिंदे उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांचे मार्गदर्शनाखाली राहुल तायडे, तहसिलदार मलकापूर, डि.एल. मुकुंदे, तहसिलदार नांदुरा, जिवन मोराणकर, अपर तहसिलदार नांदुरा, प्रविण घोटकर, नायब तहसिलदार मलकापूर, देवेंद्र कुन्हे, नायब तहसिलदार मलकापूर, श्रीकृष्ण उगले, नायब तहसिलदार मलकापूर, डी.एम. रायबोले, नायब तहसिलदार मलकापूर, एस. एम. चव्हाण, नायब तहसिलदार नांदुरा, हरीष गुरव, नायब तहसिलदार नांदुरा, आरती नारखेडे, नायब तहसिलदार नांदुरा, पि.एस. थोरात, निरीक्षण अधिकारी नांदुरा, सर्व क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी करीत आहेत.२१ मलकापूर विधानसभा मतदार संघामध्ये दिनांक १३/०५/२०२४ सोमवार रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान मतदान होणार आहे. तरी सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावुन लोकशाही बळकट करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी संतोष शिंदे यांनी केले आहे.

# स्वामी विवेकानंद विद्यालय बावी येथे १५१ विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून परिपूर्ण तयारी करून घेऊन उत्तम संस्कार व दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य स्वामी विवेकानंद विद्यालय बावी येथे सुरू आहे.राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षा,राज्यस्तरीय गुरूकुल प्रज्ञाशोध परीक्षा व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजीत शिष्यवृत्ती परीक्षा तसेच नवोदय प्रवेश पात्र परीक्षा अशा विवीध स्पर्धा परीक्षांमध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यात, जिल्ह्यात,तालुक्यात,केंद्रात क्रमांक पटकावले आहेत,तसेच अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादित केले असल्याने अशा गुणवंत १५१ विद्यार्थांचा शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते,तसेच मोठ्या प्रमाणात पालक,विध्यार्थी आणि शिक्षणाबरोबरच या शाळेत संस्काराला महत्त्व देत असल्याने महंत काशीनाथ महाराज, महंत आजिनाथ महाराज आंधळे, महंत विष्णू महाराज आंधळे, महंत आचार्य अशोक महाराज, ह.भ.प.देविदास महाराज यांच्या हस्ते विद्यार्थांना गौरवण्यात आले.

तसेच नवीनच पी.एस.आय झालेले कोहिनीचे भवर साहेब, प्रशासकीय अधिकारी,राष्ट्रसेवा करणारे सैनिक व शिक्षक तसेच प्रतिष्ठित नागरीक,व्यापारी, पत्रकार बांधव असे अनेक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांचे आजोबा-आजी आणि नातेवाईक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या सर्वांसाठी पालकांच्या व शाळेच्या वतीने आमटी भाकरी चे रुचकर जेवणाची सर्वांसाठी सोय करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांना गुणवान घडवणाऱ्या सर्व टीचर्स ना ही यावेळी सन्मान चिन्हे देऊन सन्मानीत करण्यात आले तसेच वर्षभर उकृष्ट सेवा देणाऱ्या सर्व स्कूल बस चालकांना स्वामी विवेकानंद यांची प्रतिमा भेट देऊन सन्मानीत करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अधिक क्षमता असतात,गुण असतात त्यांना मार्गदर्शन करणे जास्तीचा वेळ देऊन अभ्यास घेणे वर्षभर त्यांच्यामध्ये सातत्य ठेवणे ही ग्रामीण भागातील खुप मोठी कसरत असते पण या शाळेने प्रयत्न करून मागील १० वर्षांपासून सातत्य ठेवून दर्जेदार शिक्षण देऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून परिसरात,तालुक्यात,जिल्ह्यात व राज्यात नाव झळकावले आहे हे मात्र विशेष होय.नर्सरी,एल.के जी व यु.के.जी तसेच इ.१ ली ते ८ वी या वर्गांचे २०२४-२५ साठी प्रवेश देणे शाळेत सुरू आहे.

# डॉ.आंबेडकर जयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**




विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त परळी उपजिल्हा रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उन्हाळ्यात रक्ताचा नेहमीच तुटवडा भासत असतो अशा परिस्थितीत या रक्तदान शिबिराचे महत्त्व अत्यंत महत्व असल्याचे प्रतिपादन डॉ .रूपाली मुंडे यांनी केले.

परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात दिनांक १८ एप्रिल रोजी फुले , शाहू, आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र दैनिक सम्राट च्या वतीने डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या रक्तदान शिबिराचे उद्घाटन परळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अरुण गुट्टे ,डॉ .दिनेश कुर्मे यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयातील डॉ .रूपाली मुंडे ,डॉ .वैभव देशमुख ,माजी नगरसेवक महेंद्र रोडे ,एकतावादी रिपाईचे प्रदेश सचिव पंडितराव झिंजुर्डे, साहित्यिक अजयकुमार गंडले ,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, प्रा .विलास रोडे,मनसेचे तालुका प्रमुख श्रीकांत पाथरकर, वंचित चे तालुकाध्यक्ष गौतम साळवे ,सामाजिक कार्यकर्ते राहुल घोबाळे,शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर ,पत्रकार मोहन व्हावळे , एकतावादी रिपाईचे शहराध्यक्ष सुनील कांबळे,पत्रकार संभाजी मुंडे ,पत्रकार जगदीश शिंदे ,पत्रकार विजय रोडे आदी उपस्थित होते .याप्रसंगी डॉ .रूपाली मुंडे ,साहित्यिक अजयकुमार गंडले, महिंद्र रोडे यांनी आपले विचार मांडले. या रक्तदान शिबिरात पंडितराव झिंजुर्डे ,जगदीश शिंदे ,विकास वाघमारे ,जनार्धन गीते ,गोविंद राठोड ,ऋषिकेश बारगजे यांच्यासह परळी शहरातील अनेक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले .या कार्यक्रमास मनसेचे शहर उपाध्यक्ष विठ्ठलराव झिलमेवाड, प्रशांत कामाळे ,वंचित बहुजन आघाडीचे युवा शहराध्यक्ष प्रेम जगतकर, राजेश सरवदे , मारोती वाघमारे, नवनाथ दाने, सम्राट गायकवाड,अंबाजोगाई शासकीय रुग्णालयातील ब्लड बँकेतील आनंद सिताफ, बाबा शेख ,सय्यद नजीर ,मुस्कान शेख ,ऋतुजा शामली तसेच परळी उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.या रक्तदान शिबिराचे प्रास्ताविक संयोजक रानबा गायकवाड यांनी केले .सूत्रसंचालन प्रा .डॉ.सिद्धार्थ तायडे तर आभार प्रदर्शन पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी केले.

# वाघोली परिसरात विजेच्या कड कडाटासह जोरदार अवकाळी पाऊस



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

गेल्या दोन दिवसापासून वाघोली परिसरात विजेच्या कडकडाटासह जोरदार अवकाळी पाऊस पडला.अवकाळी पाऊस हा अवकाळीच असतो याला कुठलीच सीमा नसते आणि त्याचा अंदाज ही वर्तवता येत नसतो. त्याच्या बरसण्याचा वेग इतका असतो ते आपण सांगू शकत नाही. अचानक आलेल्या अवकाळी पावसाने अनेकांची तारांबळ उडाली. वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. भाजीपाला विक्रेत्यांचेही नुकसान झाले.

छोट्या छोट्या दुकानांची पत्रे उडून रस्त्यावर आली. अंगाची लाही लाही होत असताना पाऊस पडला अन् धरती थंडावली मात्र काहींना त्रास हि सहन करावा लागला.

# कवयित्री प्रिया माळी यांना बंधुता काव्यप्रतिभा पुरस्कार प्रदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद पुणे अंतर्गत पहिले विश्व बंधुता साहित्य संमेलन एस एम जोशी सभागृह पुणे येथे १२ एप्रिल २०२४ शुक्रवारी रोजी नुकतेच संपन्न झाले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष जेष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली व जेष्ठ साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या ऐतिहासिक विश्व बंधुता साहित्य संमेलनामध्ये लातूरच्या कवयित्री प्रिया राजेंद्र माळी यांना बंधुता काव्यप्रतिभा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले कवयित्री प्रिया माळी यांचा मृगजळ हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून सामाजिक बांधिलकीच्या कविता हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. सामाजिक भान जपणा-या कवयित्रीला पुरस्कार मिळाल्या मुळे साहित्य क्षेत्रातून त्यांना शुभेच्छा मिळत आहे.

# माझ्यासाठी वैयक्तिक लढाई नाही, ही विचारांची लढाई- सुप्रिया सुळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

माझ्यासाठी वैयक्तिक लढाई नाही, ही विचारांची लढाई आहे. समोर कोण लढत आहे, याचा विचार मी करत नाही. कारण मी वैयक्तिक टीका कधी करत नाही, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.दरम्यान सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, ३५ वर्षे आमदार, पालकमंत्री, राहिलेल्या लोकांना माझा कार्य अहवाल पाठवणार आहे. त्यांनी वेळ काढून तो वाचावा बारामतीमध्ये टीमवर्कमुळे मोठा विकास झाला आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, कश्मीर टू कन्याकुमारी ज्यांची सत्ता आहे त्यांना हे षडयंत्र करण्याशिवाय दुसरा काही मार्गच नव्हता तर ते खरे बोलले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक मी आभार मानते, आणि सातत्याने चंद्रकांत पाटील एकच गोष्ट म्हणतात की, आम्हाला शरद पवारांना संपवायचे त्यामुळे ही लढाई फक्त एका विचाराला या राज्याची अभिमान असणाऱ्या आणि देशांमध्ये ज्या नेत्याकडे एका विश्वासाच्या नात्याने बघितले जाते. शरद पवार असे नाव गेले सहा दशक महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात राहिले आहे. शरद पवारांच्या आणि महाराष्ट्राच्या विरोधात हे षडयंत्रणे दुर्दैव आहे. हे सातत्याने बोलतात एकदाची आणि पोटातली गोष्ट बाहेर आली असा टोला सुप्रिया सुळे यांनी लगावला आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904